मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
सायबर गुन्हे कक्ष
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर –०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :-१८०/२०२२ दिनांक :- १४/०६/२०२२

# महावितरण विजबिल विभागाच्या नावाने होणारी फसवणूक टाळण्याकरीता घ्यावयाची काळजी

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात ऑनलाईन पेमेंटसाठी अनेक ॲप उपलब्ध असून नागरीक त्यांचा सर्रासपणे करत आहेत. सर्व सोशल प्लेटफॉर्मवर बिल पेमेंट्स हे ऑनलाईन पध्दतीने करण्याची सुविधा ग्राहकांना वितरीत केली जाते. या पेमेंट करीता वेगवेगळया कंपन्यांचे ॲप्स असून ते सुरक्षित मानले जाते. परंतु या गोष्टीचा फायदा घेवून काही अपप्रवृत्तीचे लोक ऑनलाईन पध्दतीने नागरीकांची फसवणुक करीत असल्याबाबत तक्रारी महावितरण कार्यालयाकडे प्राप्त होत आहे.

**फसवणूकीचा प्रकार :-** आपल्या महावितरणच्या विज बिलावर जो मोबाईल नंबर रजिस्टर आहे. त्या मोबाईल नंबर वर **Text Message** किंवा **What's app Message** येत आहेत. ग्राहकाने चालू महिन्याचे विज बिल भरलेले असताना सुध्दा, तुमचे लाईट बिल त्वरीत भरा अन्यथा तुमचे विज कनेक्शन कट करणार आहे.

उदाहरणार्थ (**Fraud Text Message**)

**Dear consumer your Electricity power will be Disconnected Tonight at 9.30 pm from electricity Office. Because your Previous month bill was Not update. Please immediately contact with our electricity officer 8509XXXXXX Thank you.**

अशा प्रकारचे फ्रॉड मेसेज येत आहेत.

**घ्यावयाची काळजी :-**

- अशा प्रकारचे **Text Message** किंवा **What's app Message** आल्यास कोणीही रिप्लाय किंवा संपर्क (कॉल) करु नये. असे काही **Message** प्राप्त झाल्यास तात्काळ जवळच्या महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा.
- ग्राहकांनी आपली वैयक्तीक माहिती (**OTP**) शेअर करु नये किंवा कोणतेही ॲप डाउनलोड करु नये.
- अनोळखी लिंक प्राप्त असल्यास त्या लिंकवर क्लिक करु नये. असे केल्याने काही ग्राहकांच्या बँक अकाऊंटमधून डायरेक्ट रक्कम ट्रान्सफर झाल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

**तरी मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

-----oooo----